ECHOES INDIA

श्री राम चंद्र मिशन ®

सप्टेंबर २०१४ खंड ७ अंक ५

# मणपाक्कम येथील बातम्या

## जुलै २०१४

**शुक्रवार, दि.४ जुलैः द्वारका सदनिका संकुलाला भेटः** हिवतापामुळे एक आठवड्याहूनही अधिक काळ कमलेशभाई आजारी होते. त्यामुळे

गुरुदेवांनी त्यांना भेटावयास जाण्याचे ठरविले. आश्रमाच्या पिछाडीला लागूनच असलेल्या सदनिकांच्या संकुलामध्ये ते आपल्या गोल्फकार्टमध्ये बसून गेले. वाटेमध्ये अभ्यासींचे अभिवादन स्वीकारण्यासाठी तसेच त्यांचे प्रश्न व समस्यांना प्रतिसाद देण्यासाठी त्यांना आपला वेग कमी करावा लागत होता.

गुरुदेव उद्वाहकातून (लिफ्टमधून) बाहेर पडताच कमलेशभाईंनी त्यांचे स्वागत केले. बंधू कमलेश यांच्या घरात लावलेली छायाचित्रे, विशेषकरून बाबूजींची छायाचित्रे पाहताना गुरुदेवांना खूप आनंद झाला. तेथे कृष्णासारखी दिसणारी बुद्धाची एक मूर्ती होती. तो ‘बुद्धकृष्ण’ आहे असे गुरुदेवांना सांगण्यात आले. गुरुदेवांनी तेथे काही काळ व्यतीत केला. त्यावेळी काही अभ्यासी त्यांच्या सभोवती बसले होते. ते पाहून गुरुदेवांनी टिप्पणी केली “ज्याप्रमाणे फुलाभोवती मधमाशा असतात त्याप्रमाणे माझ्या सभोवती अभ्यासी नेहमीच असतात.” त्यानंतर झालेल्या अनौपचारिक चर्चेमध्ये गुरुदेवांनी त्यांच्या युरोप दौऱ्यांमधील आठवणींना उजाळा दिला. एकदा ते मोटारने कोठेतरी जाणार होते; पण त्यांच्यासोबत येणारा एका अभ्यासी बॅग विसरला. नंतर प्रवासात अडथळा आणणाऱ्या अशाच काहीतरी आणखी दोन घटना घडल्या. तत्क्षणी, तेथल्या तेथेच त्यांनी दौरा रद्द करण्याचा निर्णय घेतला. कालांतराने दौरा रद्द केल्याच्या परिणामस्वरूप बऱ्याच सकारात्मक घटना घडून आल्या. त्यांच्या जीवनातील अशा उदाहरणांवरून आपणांस पुष्कळ शिकण्यासारखे आहे.





कमलेशभाईंच्या घरातून बाहेर पडल्यावर गुरुदेवांनी त्या संकुलामधील अभ्यासी रहात असलेल्या सर्व सदनिकांना भेट दिली. प्रत्येकाकडे थोडावेळ थांबल्यावरच ते पुढील सदनिकेकडे जात होते. प्रत्येक ठिकाणी त्यांचे अगत्यपूर्वक आदरातिथ्य होत होते. अलीकडेच अतिशय बेचैन होऊन गुरुदेव एकदा म्हणाले होते, “किती दिवस झाले, मी एका जागेवरच अडकून पडलो आहे.” त्यामुळे ही भेट म्हणजे त्यांच्या दृष्टीने एक हवाहवासा वाटणारा बदलच होता. मात्र कुटीरात परत येईपर्यंत ते चांगलेच थकले होते व त्यामुळे त्यांना विश्रांती घ्यावी लागली. गुरुदेवांच्या प्रवास करण्याच्या, बाहेर जाण्याच्या तीव्र इच्छेला उद्देशून कुटीरात असे नेहमीच म्हटले जाते की, ‘त्यांच्या आत्म्यापाशी इच्छाशक्ती आहे पण शरीर दुबळे झाले आहे.’

**रविवार, दि.६ जुलैः पियानो :** न्याहरी व वर्तमानपत्राचे वाचन झाल्यावर गुरुदेव कुटीराच्या बाहेर येऊन काही वेळ उन्हात बसले. एका अभ्यासी बंधूला पियानो वाजवता येतो, त्याचे पियानोवादन ऐकण्याची इच्छा त्यांनी प्रदर्शित केली. तो वाजवित असतांना गुरुदेव त्याचे तन्मयतेने श्रवण करीत सभागृहात बसून होते. ते पियानो वादन ऐकण्याचा आनंद घेत होते, हे स्पष्ट दिसून येत होते. त्यानंतर ओमेगा प्रशालेत शिकत



असलेल्या एका छोट्या मुलीनेही पियानो वाजविला. आपले अभ्यासी पियानो इतका छान वाजवू शकतात हे पाहून गुरुदेवांना खूप संतोष झाला. ते म्हणाले, “पियानो खरेदी करण्याचे माझे एक स्वप्न होते पण ते कधी सत्यात उतरू शकले नाही. येथे एक पियानो असेल तर काय बहार येईल.” तेव्हा पियानो खरेदीसाठी बऱ्याच अभ्यासींनी उत्साहाने पुढाकार घेतला व अनेक सूचना केल्या. थोड्याच दिवसात पियानोची खरेदी होऊन त्याची गुरुदेवांच्या कुटीरात प्रस्थापनासुद्धा झाली. जेव्हा गुरुदेवांनी ते वाद्य पाहिले तेव्हा त्यांना झालेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होता. एका अभ्यासीने पियानो वादन केल्यानंतर गुरुदेवांनीही काही धून वाजविल्या. पियानो कोठे ठेवावा तसेच त्यावर आच्छादन घालून तो सुरक्षित कसा ठेवावा याबाबत गुरुदेवांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, जेव्हा केव्हा मनात येईल तेव्हा अभ्यासी येथे येऊन पियानो वाजवू शकतात. नंतर काही दिवस कित्येक अभ्यासी येऊन पियानो वाजवून जात होते व गुरुदेव श्रवण करीत होते.

**शनिवार, १२ जुलैः गुरुपौर्णिमा**

गुरुदेवांनी प्रसाद अर्पण केला व मोठ्या संख्येने त्यांची वाट पाहणाऱ्या अभ्यासींना भेटण्यासाठी ते तयार झाले. सुरुवातीस अभ्यासी शिस्तीने येत होते व गुरुदेव एकामागून एक याप्रमाणे प्रत्येकास रांगेने आशीर्वाद देत होते. तथापि वारंवार चरणस्पर्श न करण्याची विनंती करूनही अभ्यासी गुरुदेवांना चरणस्पर्श करीतच होते. त्यामुळे गुरुदेव थकून गेले व त्यांनी विनंती केली की जर अभ्यासींना गुरुदेवांनी स्वतः सत्संग संचालित करावा असे वाटत असेल तर त्यांनी चरणस्पर्श करण्याचे थांबवावे. तरीही अभ्यासींनी धक्काबुक्की करणे चालूच ठेवले. ही गर्दी संपेपर्यंत गुरुदेव ५०० हून अधिक अभ्यासींना भेटले होते. त्यानंतर ते ध्यानकक्षात गेले व त्यांनी ५० मिनिटांचा सत्संग संचालित केला. सत्संग झाल्यावर गुरुदेव कुटीरात निघून गेले व ध्यानकक्षात भजनाचा कार्यक्रम चालू राहिला.

**बुधवार, दि. १६ जुलै : गुरुदेवांच्या प्रकृतीत बिघाड :**

आठवड्याच्या सुरुवातीपासूनच गुरुदेवांची तब्येत ठीक नव्हती. त्यांना सतत खोकला येत होता व कसलासा जंतुसंसर्ग झाल्यासारखेही जाणवत होते. त्यामुळे कुटीरात कोणास प्रवेश द्यावा यावर कडक प्रतिबंध लागू करण्यात आले. दोन-तीन दिवसातच गुरुदेवांच्या प्रकृतीत थोडी सुधारणा झाली व ते पुन्हा सर्वांशी बोलू लागले.

**रविवार, दि. २० जुलैः**

कमलेशभाई यांनी सत्संग संचालित केला व गुरुदेवांच्या प्रकृतीविषयी निवेदन केले. बाबूजी मेमोरियल आश्रमात चेन्नई येथे येण्याऐवजी अभ्यासींनी भंडाऱ्यासाठी तिरुप्पुरला जावे यासाठी उत्तेजन देण्याच्या दृष्टीने सहज-संदेशच्या माध्यमातून संदेश प्रसारित करण्यात आला.

**मंगळवार, दि.२२ जुलैः गुरुदेवांचा तिथीनुसार वाढदिवसः**

हिंदू पंचांगाप्रमाणे या दिवशी गुरुदेवांचा वाढदिवस येत होता. पण पुन्हा त्यांना ताप आल्यामुळे ते अभ्यासींना भेटण्याच्याच काय, पण अंथरूणातून उठण्याच्याही परिस्थितीत नव्हते. सकाळी नऊचा सत्संग कमलेशभाईंनी संचालित केला. सत्संग झाल्यानंतर ‘लेटर्स टू माय ख्रिश्चन फॅमिली’ या बंधू ए.पी.दुराई यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.





## भारतातील विविध केंद्रांमध्ये पूज्य गुरुदेवांच्या जन्मदिवसाचा समारंभ

तिरूप्पूर येथील भंडाऱ्याला जे उपस्थित राहू शकले नाहीत अशा अभ्यासींसाठी भारतातील सर्व केन्द्रांमध्ये आपल्या प्रिय गुरुदेवांचा ८८वा वाढदिवस साजरा करण्यात आला. सत्संग, भजने, मुलांनी प्रस्तुत केलेली नाटके आणि कलाप्रदर्शन, अभ्यासींनी दिलेली व्याख्याने ही या समारंभांची काही ठळक वैशिष्ट्ये होती.

वडोदरा, भिलवाडा, कोलकाता, खरगपूर, जोधपूर, श्री गंगानगर, नवसारी, वलसाड, गुलबर्गा, आणंद येथून आलेल्या वृत्तांतामध्ये, समारंभादरम्यान, ईश्वरीय कृपेचा आणि आशीर्वादाचा अनुभव आल्याचे वर्णन केले आहे.


भिलवाडा


वलसाड



अलाहाबाद


सहारणपूर



घटमपूर


गुलबर्गा


लखनऊ


खरगपूर

## भारतातील विविध केंद्रांमध्ये पूज्य गुरुदेवांच्या जन्मदिवसाचा समारंभ (पुढे चालू...)


जोधपूर


श्री गंगानगर


श्रीनगर

## मुलांचा सहभाग

मुले आपल्या सहजमार्ग कुटुंबाचा एक घटक आहेत. या कुटुंबामध्ये वाढताना आश्रमामधील उपक्रमांमध्ये सहभागी व्हायला ते शिकतात आणि अगदी सहजतेने गुरुदेवांच्या शिकवणुकीमधून सद्गुण आणि मूल्ये ते आत्मसात करतात. येथे त्यांना जाणवणारी ‘प्रेम’ ही भावना आपल्या नृत्य आणि गायनाच्या सादरीकरणामधून प्रकट करण्याचे ते शिकतात. अशा संमेलनांमधील वातावरण ते चैतन्यमय बनवतात आणि आपल्याही अंतरंगात आनंद आणि प्रेम निर्माण करतात.


कोलकाता


वलसाड




वडोदरा


गुलबर्गा


लखनऊ

“मला जे द्यावयाचे आहे त्याचा स्वीकार करण्यासाठी जो स्वत:ला तयार करेल, त्यावर मुक्त हस्ताने उधळण करण्यासाठी मी कधीचा तयार आहे. शीगोशिग भरलेला हा कटोरा स्वीकारण्याकरीता अजूनपर्यंत तरी कोणीही आलेले नाही. माझ्यापाशी जे काही आहे ते सर्व लुटण्याकरीता मी अनेकदा अभ्यासींना आमंत्रित केले आहे व याच्या बदल्यात त्यांच्याकडे जे काही आहे ते त्यांनी मला द्यावे असे सांगितले आहे. निष्पक्षपाती देवाणघेवाण ही काही लूट नाही”

— बाबूजी महाराज






## सहसचिवांची भेट, हुबळी, कर्नाटक

दि. ८ ते १० ऑगस्ट दरम्यान सहसचिव बंधू ए. पी. दुराई यांनी हुबळी येथे भेट दिली.

दि. ८ ऑगस्ट रोजी शहरापासून सुमारे १२ कि. मी. अंतरावर असलेल्या नवीन आश्रमाच्या जागी त्यांनी प्रस्थान केले. दुपारी या प्रकल्पाची देखरेख करणाऱ्या अभ्यासींसोबत त्यांनी जागेच्या विकासासंदर्भात मार्गदर्शनपर चर्चा केली. यावेळी ते म्हणाले की येथे भूखंड (प्लॉट्स) विकत घेतलेल्या अभ्यासींनी लवकरच घरे बांधावीत कारण वसाहतीशिवाय अशा लांबवरच्या ठिकाणी आश्रम उभारणे ही संकल्पना व्यर्थ होईल. आश्रमाच्या जागेमध्ये ध्यानासाठी एक तात्पुरत्या स्वरुपाचा ध्यानकक्ष /मंडप बांधण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला, यामुळे येथे वारंवार भेट देणाऱ्या अभ्यासींची सोय होऊ शकेल.

संध्याकाळी गीता रेश्मी यांच्या घरी पार पडलेल्या घरगुती मेळाव्याला ते उपस्थित राहिले आणि मुमुक्षूंच्या गटाशी संवाद साधताना त्यांनी 'सहजमार्ग पद्धतीची मूलतत्वे' विशद केली.

दि. ९ ऑगस्ट रोजी धारवाड येथील 'कर्नाटक विश्वविद्यालयामध्ये' विविध शाखांमधील पदवीधर विद्यार्थी उपस्थित असलेल्या एका परिसंवादाला त्यांनी संबोधित केले. पदवीधर विद्यार्थ्यांना सहजमार्ग तत्त्वप्रणालीचे विवरण करताना त्यांनी स्वत:च्या जीवनामधील अनुभवांचे उदाहरण देत, जीवनामध्ये दिशाभूल करणाऱ्या प्रलोभनांना बळी न पडणे आणि साधेपणाची आवश्यकता या विषयांवर भर दिला. आध्यात्मिक साधनेमधून प्राप्त झालेले आत्मिक (आंतरीक) बल आणि स्वत:च्या आत्मसन्मानामध्ये होणारी वृद्धी या विषयांवर देखील त्यांनी जोर दिला.

याचवेळी हुबळीपासुन सुमारे अठ्ठेचाळीस कि.मी. अंतरावर असलेल्या मुन्दगोड शहरामधील शासकीय महाविद्यालयामध्ये विभागप्रमुख डॉ. गजेन्द्र सिंग (उत्तर कर्नाटक विभाग) यांनी खुले सत्र आयोजित केले होते. सुमारे दीडशेहून अधिक वरिष्ठ विद्यार्थी आणि महाविद्यालयामधील अध्यापकांनी या खुल्या सत्रामध्ये भाग घेतला. आपल्या भाषणामध्ये त्यांनी आपल्या जीवनामध्ये ध्यान, खरे प्रेम आणि खरा आनंद यांची भूमिका आणि आंतरीक मार्गदर्शनाची आवश्यकता या विषयांवर भर दिला.

संध्याकाळी गीता कामत यांच्या घरामधील अनौपचारीक चर्चेमध्ये बंधू ए. पी. दुराई यांनी मूलभूत साधना योग्य पद्धतीने करण्याचे महत्त्व आणि अभ्यासींमध्ये बंधुभावाची आवश्यकता याविषयांवर भर दिला.

रविवारी सत्संगानंतर बंधू दुराई यांनी निवडलेल्या विषयांवर अभ्यासींसाठी समूहचर्चा आयोजित करण्यात आली होती. त्यामधील काही विषय खालीलप्रमाणे होते:

१. इतरांना सहजमार्ग पद्धतीकडे आकर्षित करणारे असे आपले व्यावसायिक आणि व्यक्तीगत जीवन असले पाहिजे.

२. नवीन आश्रमाचा वापर प्रभावीपणे होण्यासाठी तुम्ही काय सुचवाल?

३. आध्यात्मिक व भौतिक जीवनामध्ये असणारी सीमारेखा कृत्रिम आहे.

दुपारच्या जेवणानंतर प्रश्नोत्तराचे सत्र झाले आणि ४:३० च्या सत्संगानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. त्या रात्री बंधू दुराई बेंगलोरला रवाना झाले. सर्व अभ्यासींनी त्यांच्या भेटीबद्दल आनंद व्यक्त करत, त्यांना लाभ झाल्याचे नमूद केले.

## भोपाल येथे यु-कनेक्ट

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी मिशनने यु-कनेक्ट हा उपक्रम सुरु केला आहे. एम. पी. विभागामध्ये इंदौर आणि भोपाळ येथे हे काम सुरु होऊन आता इतर केंद्रामध्ये याचा प्रसार होतो आहे.

इंदौर केंद्रामध्ये आठ आठवड्यासांठी या उपक्रमाचे पूर्व परीक्षण करण्याच्या उद्देशाने आयोजन केले गेले होते. एका महाविद्यालयाने सप्टेंबरपासून ते सुरु करण्याची अनुमती दिली आहे.

इंदौर केंद्रामधील प्रशिक्षित स्वयंसेवकाच्या चमूने दि. १३ जुलै रोजी भोपाळ येथील स्वयंसेवकांसाठी एक मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित केला होता. त्यांनी आपल्या अनुभवांची आणि ज्ञानाची परस्परांशी देवाण घेवाण केली.

भोपाळ येथील स्वयंसेवकांशिवाय, जवळपास असणाऱ्या विदिशा, मंदिदीप, रायसेन, सिहोर आणि नरसिंगगड या केन्द्रांमधून सुमारे त्रेसष्ठ अभ्यासी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

विभाग समन्वयक यामिनी करमरकर आणि त्यांच्या गटातील सदस्य राजेश रावेरकर, निर्मल दागदी आणि रमाकांत अग्रवाल (इंदौर) यांनी सहभागींशी संवाद साधला आणि यु-कनेक्टच्या विविध पैलूंशी त्यांची ओळख करून दिली.

महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये हा उपक्रम राबविण्यापूर्वी अशी पूर्व-परीक्षण सत्रे आयोजीत केली जावी यासाठी त्यांनी विविध केंद्रांना प्रोत्साहीत केले. लागोपाठच्या दोन सत्रांदरम्यान महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांना आत्मविकासाच्या अभ्यासक्रमाची ओळख करुन देण्याविषयी चर्चा देखील झाली.

लवकरच यु-कनेक्ट चमू आपले काम सुरु करेल असे आश्वासन देऊन केन्द्रप्रमुख पंकज माथुर यांनी या सत्राची सांगता केली.

# युवकांसाठी कार्यक्रम

## तरुणांना प्रेरणा देणे, इंदौर



इंदौर केंद्रामधे युवा अभ्यासींसाठी 'हृदयीचे बोल' नावाचा एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. व्यवसायाने डॉक्टर व देवास केंद्राचे केंद्रप्रमुख असणाऱ्या प्रशिक्षक विकास शिऊरकर यांनी आपल्या जीवनानुभवांचे कथन केले.

प्रथम चर्चा व त्यानंतर प्रश्नोत्तरे असे या कार्यक्रमाचे स्वरुप होते. राजेश रावेरकर यांनी बंधू विकास यांची मुलाखत घेतली व त्यांना त्यांच्या जीवनातील विविध प्रसंग, त्यांचे गुरुदेवांसमवेतचे अनुभव, तरुण अभ्यासी म्हणून आलेल्या समस्या तसेच सरकारी नोकरी करताना, जेथे भ्रष्टाचार ही परंपरा झालेली आहे, अशा संदर्भावर आधारित प्रश्न विचारले. बंधू विकास यांनी त्यांचे अनुभव, त्यांच्या भावना व सहजमार्गाची त्यांना त्यांच्या जीवनात कशी मदत होत आहे ते सांगितले. या वेळी दिलेल्या विस्मयजनक संदेशांपैकी एक संदेश हा होता की गुरुदेवांच्या कृपेने जसजसा आपला विकास होतो तसतशी आपल्या आसपासच्या सर्व गोष्टींविषयी, सर्व माणसांविषयी सहनशीलता/ सहिष्णुता वाढत जाते. विश्वास, गुरुदेवांवरील प्रेम आणि सेवा या विषयांवर त्यांनी भाष्य केले.

या ९० मिनीटांच्या मुलाखतीनंतर युवा अभ्यासींनी अतिशय व्यावहारिक स्वरुपाचे अनेक प्रश्न विचारले.

मिशनमधील युवकांना त्यांच्या ज्येष्ठ बंधूंच्या अनुभवातून बोध घेऊन, त्यांच्या दैनंदिन जीवनातील समस्या आध्यात्मिक संदर्भाने सोडवण्यास मदत करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. यामुळे त्यांना सहजमार्ग त्यांच्या कामाच्या वा अभ्यासाच्या ठिकाणी घेऊन जाण्यास मदत होईल.

निमेश पालीवाल या तरुण अभ्यासीने हा कार्यक्रमाचे संचालन केले व अविनाश यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमात ४० पेक्षा जास्त युवा अभ्यासी हजर होते. असा कार्यक्रम प्रत्येक महिन्याला आयोजित करण्याचे ठरविण्यात आले आहे.

## मणप्पाक्कम, तामिळनाडू

मणप्पाक्कम येथे दि. ३ ऑगस्ट रोजी चेन्नईतील सुमारे पन्नास युवक व काही परदेशी अभ्यासींसाठी एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

प्रत्येक अभ्यासीला एक कार्ड दिले गेले होते. त्यावर एक गुण नमूद करण्यात आला होता. कार्यक्रमाचा प्रारंभ दि.२५ सप्टेंबर २०१२च्या व्हीस्पर्सने झाला. यानंतर औपचारिकता, संकोच दूर करणारे एक सत्र झाले ज्यादरम्यान सहभागींनी स्वत:ची ओळख करून दिली व त्यांना दिलेल्या गुणाचे नाव सर्वांना स्मरणशक्तीच्या खेळासाठी लक्षात राहाण्यासाठी मोठ्याने वाचून दाखवले तसेच सहजमार्गात सहभागी झाल्यानंतर त्यांना जाणवलेल्या विलक्षण गोष्टी त्यांनी कथन केल्या. सर्वांना सहज मार्गाची दहा सूत्रे आठविण्यास व या सूत्रांना जसेच्या तसे उद्धृत करण्यास सांगण्यात आले.

'सूत्र कुटुंबाला शोधा' याचा मुख्य हेतू प्रत्येक सूत्राशी संबधित गुणांचा शोध हा होता. प्रत्येक सहभागीस त्याला दिलेल्या कार्डावरील गुण कोणत्या सूत्राशी जुळतो तसेच तेच सूत्र असलेल्या त्यांच्या गटसहकाऱ्यांना सुध्दा ओळखायचे होते.

प्रत्येक गटाने 'व्यक्त करण्याची पध्दत' या विषयावर चर्चा केली. नवीन सदस्यांना सहजमार्गाची ओळख करून देतांना जे महत्वाचे मुद्दे आहेत ते नीट समजून घेण्याच्या आवश्यकतेवर या उपक्रमात भर दिला होता. सहभागींना आत्म-परीक्षण करण्यास व त्यांचे विचार व्यक्त करण्यास भरपूर वेळ देण्यात आला होता.

ध्येयावर लक्ष केंद्रित करण्याचे महत्त्व 'डार्ट गेम' च्या माध्यमाद्वारे व्यक्त करण्यात आले. सर्व सहभागींनी त्याचा आनंद घेतला. चहा व नाश्त्यानंतर 'खरेखुरे स्व-अनुशासन निर्माण करण्यासाठी पाच सूचना' व हॉवर्ड मार्टिन यांचे 'हृदयाच्या बुध्दिमत्तेचा उपयोग करणे' यावरील भाषण या दोन चित्रफिती दाखविण्यात आल्या.

सभारंभाच्या शेवटी सर्वांनी त्यांचे विचार व्यक्त केले. सूचना व प्रतिक्रिया नमूद करण्यात आल्या.



## मूल्यशिक्षण

सन २००० पासून मिशनच्या विविध केंद्रांमधून राबविल्या जाणाऱ्या मूल्याधारित शिक्षणाच्या उपक्रमाविषयी आपणा सर्वांनाच माहीत आहे. संपूर्ण भारतभरातून सुमारे १०० शाळांनी याचा लाभ घेतला आहे. मिशनने सुमारे १०,००० शिक्षकांना या कार्यक्रमाअंतर्गत प्रशिक्षित केले आहे. या कार्यक्रमामध्ये आणखी सुधारणा व्हावी आणि याचे पुन:परीक्षण व्हावे अशी गुरुदेवांची इच्छा होती.

मूल्याधारित प्रशिक्षण राबविणाऱ्या चमूने गतअनुभव तसेच कार्यक्षेत्रामधून मिळालेल्या प्रतिक्रिया यांवर आधारित यात काही सुधारणा घडवून आणल्या आहेत. सध्या या कार्यक्रमाचे नाव 'मूल्यशिक्षण' असे बदलण्यात आले आहे. हा कार्यक्रम आता इयत्ता ८वी ते १२वीच्या मुलांसाठी राबविण्यात येणार आहे. सहा मूलभूत मूल्यांवर– प्रामाणिकपणा, विनम्रता, धैर्य, जबाबदारी, प्रेम आणि स्वातंत्र्य यांवर आधारित प्रत्येक वर्गासाठी २० सत्रे राबविली जाणार आहेत. ही सत्रे अभ्यासी स्वयंसेवक शाळांमधून नियमित वेळापत्रकाचा भाग म्हणून संचालित करणार आहेत.

प्रत्येक सत्र अधिक मनोरंजक व रुचिपूर्ण व्हावे या हेतूने, तसेच विद्यार्थ्यांना प्रेरीत करण्याची व समानुभूतीचा अनुभव देण्याची आवश्यकता ध्यानात घेऊन परस्पर–संवादी अशी शिकविण्याची पद्धत स्वीकारण्यात आली आहे. यामध्ये व्हिडिओ, कथा, व्यायाम तसेच विद्यार्थी विचार करण्यास प्रवृत्त होतील अशाही गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

मे २०१४ च्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस नऊ केंद्रांमधून पंधरा शाळांनी हा कार्यक्रम राबविण्यात रुची दर्शविली. या केंद्रांमध्ये रेवा (२ शाळा), वडोदरा (३ शाळा), हैद्राबाद (२ शाळा), त्रिची (२ शाळा), मुंबई (१ शाळा), चेन्नई (१ शाळा), दिल्ली (२ शाळा) आणि सूरत (१ शाळा) या केंद्रांचा समावेश आहे.

या उपक्रमामध्ये रंजनी बालाजी या अभ्यासक्रम तयार करणे व प्रशिक्षण देणे, कांती पप्पू या केंद्रांशी संपर्क करणे आणि ज्योती रेड्डी या अभ्यासक्रमाशी संबंधित माहिती तंत्रज्ञान विभाग सांभाळणे अशी कामे करीत आहेत. केंद्र पातळीवर अनेक स्वयंसेवक कार्यरत आहेत. आगामी शैक्षणिक वर्षासाठी काही शाळांची आधीपासूनच निवड करण्यात आलेली आहे.

ज्या केंद्रांना यामध्ये सहभागी व्हावयाचे असेल त्यांनी कांती पप्पू यांना vbe@shpt.in या पत्त्यावर संपर्क करावा .

### केंद्राचे अनुभव

**वडोदरा**: प्राथमिक प्रकल्प म्हणून बरोडा हायस्कूल, ओएनजीसी शाळेतील ८वीच्या चार वर्गांमध्ये आणि बरोडा हायस्कूल, अलकापुरी येथील ९वीच्या दोन वर्गांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. दहा स्वयंसेवक शिकविण्यासाठी तर पाच जण त्यांचे मदतनीस म्हणून कार्यरत होते. प्रत्येक आठवड्यात एका दिवशी ते सर्व वर्गातील उपक्रमांबद्दल चर्चा करण्यास एकत्र जमत. गोत्री येथील तेजस विद्यालयाने मूल्याधारीत अभ्यासक्रम स्वीकारला आहे. तेथील शिक्षकांनीच शिकविण्याचे काम स्वत:कडे घेतले आहे. शाळेच्या अधिकाऱ्यांचे सहकार्य वाखाणण्याजोगे आहे. विद्यार्थ्यांचाही प्रतिसाद उत्तम आहे आणि त्यांना या उपक्रमामध्ये रुची निर्माण होत आहे.



अलकापुरी



ओएनजीसी

**मुंबई**: महाराष्ट्रामध्ये बिलाबॉन्ग इंटरनॅशनल शाळा व नागोठणे येथील जे.एच.अंबानी शाळा येथे इयत्ता ८वीच्या वर्गांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येत आहे. मिशनच्या स्वयंसेवकांच्या मदतीने येथे दोन्ही शाळांमध्ये हा उपक्रम संचालित केला जातो. या शाळांमधील सेवकवर्ग खूपच सहकार्य करणारा आहे. वर्गामध्ये स्वयंसेवकांशी संवाद साधताना विद्यार्थ्यांचा सहभाग तसेच उत्साह वाखाणण्याजोगा आहे. मुले अद्भुत आणि खुल्या मनाची आहेत व जे काही शिकविण्यात येत आहे त्याचे त्यांना उत्तम आकलन होत आहे.

पहिले मूल्य– 'प्रामाणिकपणा' – समजण्यास मुलांना फार सोपे वाटले. प्रत्येक सत्रामधील अवतरणांविषयी निरीक्षणे, विचार व चिंतन टिपून घेण्याची सुरूवात म्हणून मुलांना दैनंदिनी लिखाणाची सुरुवात करण्यास सांगण्यात आले. वर्गात यावेळी खूपच हलके–फुलके व आनंदी वातावरण असते. मूल्य शिक्षण मराठी आणि हिंदीमधून देण्यासाठी जे.एच.अंबानी शाळेच्या मुख्याध्यापकांनी स्वयंसेवकांना पाचारण केले आहे.



मुंबई



नागोठणे

## मन्नवरप्पडू, नेल्लोर ग्राम



नेल्लोर ग्राम येथे मन्नवरप्पडू गावाजवळ नेल्लोरच्या अभ्यासींनी ३३ एकर जमीन विकत घेतली आहे. यापैकी ५.८५ एकर जमीन ध्यानकक्ष व इतर सुविधा यांच्या बांधकामासाठी आरक्षित ठेवण्यात आली आहे. बाकीच्या जमिनीचे ३०० भाग करण्यात येणार आहेत.

पूज्य गुरूदेवांच्या आशीर्वादाने व परवानगीने नेल्लोर केंद्राच्या प्रमुख भगिनी उमा गंगाधर यांच्या हस्ते दि. ६ ऑगस्ट रोजी स्वयंपाकघर व भोजनकक्षाचा शिल्यान्यास /भूमिपूजन, सुलोचना सदन, मन्नवरप्पडू येथे करण्यात आले. या बांधकामास सुमारे २० लाख रुपये इतका खर्च अपेक्षित आहे, त्यातील ४ लाख रुपये प्रसाधनगृह बनविण्यास लागतील. या कार्यक्रमानंतर सत्संग झाला. यामध्ये नेल्लोरच्या अभ्यासींबरोबरच कावली, बुचिरेड्डीपालेम, सिद्दिपुरम, गुडूर, वेंकटगिरी, नायडूपेटा व पोडलाकुर अशा आजूबाजूच्या केंद्रांमधील एकूण २०० अभ्यासीही सामील झाले होते. या पावन प्रसंगी केंद्रप्रमुखांनी आश्रमाचे बांधकाम कमीत–कमी वेळात पूर्ण व्हावे याकरीता, बांधकामाच्या प्रक्रियेत पुढाकार घेऊन स्वयंसेवी काम करण्याचे आवाहन अभ्यासींना केले.

## विभागीय बैठक, हरियाणा

दि. १७ ऑगस्ट रोजी सोनपत आश्रम येथे विभागीय बैठक (झोन २१) आयोजित करण्यात आली होती. विभाग प्रमुखांच्या उपस्थितीत सर्व प्रशिक्षक, सहनिर्देशक, समन्वयक, स्वयंसेवक व केंद्रप्रमुख यांना या बैठकीचे आमंत्रण देण्यात आले होते. यामध्ये विस्तृत अशा कार्यसूचीवर चर्चा झाली. विभाग प्रमुख सत्या एन. मंडल यांनी विभागामध्ये परस्परात तसेच गुरुदेव व कमलेश भाईंच्या समवेत संवाद कसा साधावा यावर एका सादरीकरणाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. मिशनने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करून शिस्तबद्ध रितीने सुसंवाद साधण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकीत विभाग प्रमुखांनी सर्व केंद्र–प्रमुखांना, प्रशिक्षकांना व स्वयंसेवकांना सहजमार्गाच्या सैनिकांप्रमाणे काम करण्याचे आवाहन केले.



ज्या केंद्रांमध्ये प्रशिक्षक नाहीत तेथे रविवारी आणि बुधवारी कसे सत्संग संचालित करावयाचे यावर चर्चा करण्यात आली. मागील वर्षात झालेल्या प्रगतीविषयी, कामगिरीबद्दल व सुधारणेकरीता हाती घेण्यात आलेल्या उपक्रमांविषयी केंद्रप्रमुख व प्रभारी प्रशिक्षकांनी माहिती दिली. विभाग–सहनिर्देशकांनी यु–कनेक्ट, क्रेस्ट, प्रशिक्षण आणि विकास, मूल्यशिक्षण, निबंध लेखन कार्यक्रम, माहिती तंत्रज्ञान, अभ्यासींची नोंदणी, एकोज, इतिहास चमू व हिशोब (लेखा विभाग) अशा त्यांच्या विशिष्ट कार्यक्षेत्रांची यावेळी माहिती दिली.

## उदयपूर, राजस्थान

तिरुप्पूर भंडाऱ्यादरम्यान कमलेशभाईंनी आपल्या भाषणात सांगितल्याप्रमाणे ए बिंदू वरील ध्यान आणि बी बिंदूचे शुद्धिकरण यावर एक ‘अवगत सत्र’ आयोजित करण्यात आले होते. केंद्रप्रमुखांनी यावेळी या बिंदूंची जागा आणि महत्व उपस्थित असणाऱ्या ३४ अभ्यासींना स्पष्ट करून सांगितले. या विशेष अशा तंत्रांविशयी अभ्यासींचे आकलन वाढावे हा या सत्राचा उद्देश्य होता. अभ्यासींच्या शंकांचे निरसन करण्यासाठी सगळ्यात शेवटी प्रश्नोत्तराचा कार्यक्रमही झाला.



## क्षणचित्रे


मुथुर

### मुथुर, तमिळनाडू येथील पहिला बुधवारचा सत्संग

मुथुर हे तमिळनाडूतील कांगेयम केंद्रापासून १८ किलोमीटर अंतरावर असणारे एक छोटे गाव आहे. लांब असल्यामुळे मुथुर येथील सहा अभ्यासी नियमितपणे वैयक्तिक सिटिंग्ज घेऊ शकत नव्हते. केंद्रप्रमुख, टी. वी. विश्वनाथ यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार कांगेयम आश्रमातील प्रशिक्षकांनी सिटिंग्ज देण्यास मुथुरला जाण्यास सुरुवात केली. जेव्हा अभ्यासींची संख्या ३० पर्यंत वाढली तेव्हा केंद्रप्रमुखांनी आठवड्याच्या मध्यातील सत्संग तेथेही संचालित करण्याचा सल्ला दिला. घरगुती मेळाव्यासमवेत बुधवारचा प्रथम सत्संग दि. ११ जून रोजी संध्याकाळी ५ वाजता केंद्रप्रमुखांनी संचालित केला. मुथुर येथील जवळपास ३० अभ्यासी आणि कांगेयम येथील काही अभ्यासी या वेळी उपस्थित होते. सत्संगानंतर 'गुरू, मिशन, पद्धती आणि ध्येय' तसेच 'सहजमार्गाची आवश्यकता' या विषयांवर भाषणे झाली. पाच नवीन इच्छुकांनी सहजमार्गात येण्यात रस दाखविला.

### क्रीडा दिवस, अहमदाबाद , गुजरात

दि. १५ ऑगस्ट रोजी, अहमदाबाद येथील अडालज योगाश्रमात ध्वजारोहणाबरोबर क्रीडा दिवसही साजरा करण्यात आला. सर्व अभ्यासींना आमंत्रण देण्यात आले होते आणि प्रत्येक जण सहभागी झाले. कार्यक्रमाची सुरुवात ७.३० वा. सकाळच्या सत्संगाने झाली. ९.३० च्या न्याहारीनंतर ध्वजारोहण झाले. १० ते १ या वेळेत अनेक क्रीडाप्रकार घेण्यात आले यानंतर दुपारचे जेवण झाले. खेळांमध्ये संगीतखुर्ची, कॅरम, टेबल टेनीस, दोरीउड्या, १–मिनिट गेम, ठिकाणे दाखवा, चमचा लिंबू, गोणपाट–शर्यत व जोडप्यांची शर्यत यांचा समावेश होता. सर्व सहभगिंनी उपक्रमाचा पुरेपूर आनंद घेतला.



वाराणसी


अहमदाबाद

### लालपनिया, झारखंड

दि. ६ जुलै रोजी 'ध्यान' या विषयावर एक जी. आय. टी. पी. सत्र घेण्यात आले. याकरीता २२ अभ्यासी उपस्थित होते. कार्यक्रम खूपच परिणामकारक झाला आणि सहभागी झालेल्या प्रत्येकासाठी तेथे खूप शिकण्यासारखे होते. हा कार्यक्रम ही गुरुदेवांची भेट आहे हे सर्वांना जाणवले. शिवाय अभ्यासींमध्ये बंधुत्वाची भावना निर्माण झाली.


लालपनिया

### मणिनगर, अहमदाबाद येथे रविवारच्या सत्संगाची सुरुवात

गुरुदेवांच्या परवानगीने अहमदाबादला रविवारचा सत्संग आता कांकरिया तलावाजवळील मणिनगर या शहरातील केंद्रामध्ये होईल. शहरात रहाणाऱ्या अभ्यासींसाठी हे एक मध्यवर्ती आणि सहज जाता येण्याजोगे ठिकाण आहे. दि. ३ ऑगस्ट रोजी संचालित करण्यात आलेल्या पहिल्या सत्संगास ६० पेक्षा जास्त अभ्यासी उपस्थित होते. यापैकी २०% अभ्यासींना याआधी विविध कारणांसाठी रविवारच्या सत्संगास उपस्थित रहायचे भाग्य मिळाले नव्हते. या प्रकारच्या व्यवस्थेमुळे रविवारी आश्रमात पोहोचू न शकणाऱ्यांना लाभ होईल अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

### अखिल भारतीय निबंध लेखन कार्यक्रम २०१४ कार्यशाळा, वाराणसी, उ.प्र.

ही विभागीय स्तरावरील (विभाग १२ड) कार्यशाळा दि. ५ जुलै रोजी स्वयंसेवकांना उपक्रमाबद्दल सूचना आणि मार्गदर्शक तत्त्वांची ओळख करुन देण्यासाठी आयोजित करण्यात आली होती. विभागातील २३ केंद्रे आणि उपकेंद्रातील सुमारे ६० स्वयंसेवकांनी कार्यशाळेत सहभाग घेतला. शेवटी उपक्रमाचे सामान वाटण्यात आले.

## सहज मार्गाचा प्रसार

### शोलावंदन, तमिळनाडू



दि. ३० जुलै २०१४ रोजी शोलावंदन केंद्रात एक खुले चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. याचे संचालन केंद्रप्रमुख बंधू रामनाथन आणि इतर दोन प्रशिक्षकांनी केले. अभ्यासी आणि नवागत अशा ५० हून अधिक लोकांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. कार्यक्रमाचा प्रारंभ साधना व तिचा प्राचीन काळातील उगम यांच्या औपचारीक परिचयाने झाला. संवादात्मक सत्रात लोकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. हे सत्र सहजमार्ग पद्धतीच्या वैशिष्ट्यांबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी उत्सुक असणाऱ्या नवागतांमुळे अर्थपूर्ण झाले.

### सरकारी कोषागारात (ट्रेझरी आफीस) परिसंवाद, अहमदाबाद, गुजरात



सरकारी कोषागारात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मिशनबद्दल माहिती देण्यासाठी एक खास कार्यक्रम तयार करण्यात आला होता. बंधू जिग्नेश यांना ३० मिनिटांचा वेळ भाषणासाठी देण्यात आला होता. विभागप्रमुखांची परवानगी घेतल्यावर आणि उपलब्ध वेळेचे काटेकोर नियोजन करुन त्यांनी आपल्या पद्धतीची परिणामकारकता यावर त्यांनी विस्तृत माहिती दिली. अनेक इच्छुकांनी मिशनमध्ये येण्यास आणि असे कार्यक्रम संचालित करण्यात रस दाखविला.

### मेंगलोर, कर्नाटक



सोमवार दि. ११ ऑगस्ट २०१४ रोजी बेसंट फर्स्ट ग्रेड इविनिंग कॉलेज, मेंगलोर येथे सुमारे ९० विद्यार्थी आणि ५ प्राध्यापकांसाठी एक खुले सत्र आयोजित करण्यात आले होते. अध्यात्माचे महत्व आणि सहजमार्गाची अद्वितीय अशी वैशिष्ट्ये याचे प्रेक्षकांना तपशिलवार स्पष्टीकरण देण्यात आले. महाविद्यालयाच्या ११ विद्यार्थी आणि १ प्राध्यापक यांनी मिशनमध्ये येण्यात रुची दाखविली. महाविद्यालयाच्या आवारातच इच्छुकांना वैयक्तिक सिटिंग्ज देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.



### कुम्मरिकुंटा, तेलंगणा येथील नवीन केंद्र

करिमनगर जिल्ह्यातील एक दुर्गम भागात वसलेले कुम्मरिकुंटा येथे आता एक नवीन केंद्र सुरू करण्यात आले आहे. १९९२ पासून, या खेड्यातील ४ अभ्यासी जवळच्या पेड्डापल्ली केंद्रात सत्संगास उपस्थित राहण्यासाठी आणि वैयक्तिक सिटिंग्ज घेण्यासाठी प्रवास करीत असत. विभागप्रमुख (विभाग १ए), मधू कोटटापल्लि पेड्डापल्ली केंद्रास भेट देण्यास आले असताना कुम्मुरिकुंटाच्या अभ्यासींना भेटले आणि या ठिकाणी एक नवीन केंद्र तयार करण्याची आवश्यकता त्यांच्या ध्यानात आली. रविवारचा सत्संग सुरु करण्याची परवानगी त्यांना देण्यात आली. केंद्रप्रमुखांनी अणि त्यांच्या गटाने नुकतीच दि. ९ ऑगस्ट रोजी या केंद्राला भेट दिली व ५ महिन्यापेक्षा कमी कालावधीत या खेड्यातील अभ्यासींची संख्या २४ पर्यंत वाढलेली पाहून त्यांना समाधान वाटले. या ठिकाणाचे वातावरण हे आध्यात्मिक ओढीचे आणि तरल आहे अशी टिप्पणीही या गटाने गेली.

## हुबळी आश्रम, कर्नाटक

# प्रकाशाचे केंद्र










उत्तर कर्नाटकामधील सर्वात झपाट्याने वाढत असलेल्या शहरांपैकी एक असे हुबळी शहर रेल्वे, रस्ते व आंतर्देशीय विमानमार्गाने जोडलेले आहे. हुबळीहून २० किमी अंतरावरील जुळे शहर धारवाड येथे जिल्हा मुख्यालय आहे.

हुबळी केंद्राची सुरुवात, तेव्हाचे संस्थेचे सरचिटणीस श्री सरनाडजी यांच्या प्रयत्नांमुळे १९९७ मध्ये दोन अभ्यासींसमवेत झाली. सुरुवातीस, केंद्राचा स्वत:चा आश्रम होण्याआधी बंधू पावसकर यांच्या घरी व त्यानंतर महिला विद्यापीठ आणि बॅन्कर्स क्लब याठिकाणी सत्संग संचालित केले जात असत. तेव्हा केंद्रामध्ये सुमारे पन्नास अभ्यासी होते.

आश्रमाच्या जमिनीच्या नोंदणीकरणासाठी गुरुदेवांनी हुबळीला दि. ५ एप्रिल २००२ रोजी भेट दिली. तेव्हा त्यांनी रेल्वेने प्रवास केला होता व या परिसरामध्ये दिव्यता पसरविण्यासाठी हुबळी केंद्राला स्वत:चा एक आश्रम मिळेल असा आशीर्वाद दिला होता. त्या प्रसंगी ते म्हणाले, “प्रत्येक वेळी आपण जेव्हा एक नवीन जमिनीचा भाग आपले समर्थ गुरुदेव बाबूजी महाराजांना समर्पित करतो, तेव्हा एक प्रकारचा आंतरिक आनंद मिळतो. हे जणू काही घरामध्ये एका लहान मुलाचे आगमन झाल्याप्रमाणेच आहे. प्रत्येक आश्रम हा समर्थ गुरुदेवांसाठी एक दिव्य असे निवासस्थान असते, ज्यामध्ये आपण त्यांच्या उपस्थितीसाठी आवाहन करतो व त्यायोगे आपण त्यांचा प्रकाश चिरकाल व निरंतर उपलब्ध ठेऊ शकतो.”

आश्रम विमानतळापासून व नवीन बसस्थानकापासून २.५ कि. मी अंतरावर वसलेला आहे. आश्रमाच्या जागेच्या ११ सेंट (सुमारे ४७९१ चौ. फूट) क्षेत्रफळाच्या भागावर १४०० चौ. फूट आकाराचा, सुमारे १५० अभ्यासी बसू शकतील असा ध्यानकक्ष बनविण्यात आला आहे. याशिवाय आश्रमामध्ये स्वयंपाकघर, भोजनकक्ष, कार्यालय, प्रसाधनगृह व शौचालये आहेत. भरपूर झाडा-पानांनी नटलेला व मुलांसाठी खेळण्याची जागा असणारा एक बगिचाही येथे आहे.

दर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी पूर्ण दिवसाचा सत्संग संचालित केला जातो. रविवारच्या सत्संगाला १०० हून अधिक अभ्यासी उपस्थित असतात. कर्नाटक राज्यासाठी काही प्रशिक्षण शिबीरेही या आश्रमामध्ये आयोजित केली गेली आहेत. शिक्षकांसाठी VBSE प्रशिक्षण, प्रशिक्षक प्रशिक्षण शिबीर व प्रकाशन गटाची कार्यशाळा अशा काही शिबीरांचा यामध्ये सामावेश आहे. इतर कार्यकलापांमध्ये नियमित अभ्यासी प्रशिक्षण, निबंध स्पर्धेचे समन्वयन, मिशनच्या प्रकाशनांचे वितरण व लहान केंद्रांमध्ये ओळखपत्रांचे वितरण इ. सामाविष्ट आहेत.

हा आश्रम अस्तित्वात आल्यापासून सभोवतालच्या परिसरामध्ये नवनगर, नवलगुंड व कैगा अशा ३ केंद्रांचे निर्माण झाले. घरगुती मेळावे, खुली सत्रे व अभ्यासी प्रशिक्षण असे कार्यक्रम नियमितपणे या केंद्रांमध्ये होत असतात.

भविष्याचा मागोवा घेऊन ५ एकर जागा आश्रमासाठी व ९ एकर जागा अभ्यासींच्या कॉलनीसाठी अशा विचाराने १४ एकर जागा विकत घेतली गेली. ही नवीन जागा सध्याच्या आश्रमापासून १२ किमी अंतरावर आहे. सहसचिव श्री ए. पी. दुराईंच्या नुकत्याच झालेल्या भेटीदरम्यान अभ्यासी व मिशनच्या अधिकाऱ्यांदरम्यान झालेल्या बैठकांमध्ये या ठिकाणी मुलभूत सोयी-सुविधांचा कशाप्रकारे विकास करण्यात यावा व आश्रमाजवळ अभ्यासींची वसाहत लवकरच कशी तयार करावी याबद्दल काही निर्णायक पावले उचलण्याचे ठरले.



To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org

© 2014 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. “Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", “SRCM”, “Constant Remembrance” and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.